www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११४ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१९ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## कोचिंगमध्ये १६ वर्षांखालील मुलांना प्रवेश नाही

# शिकवणी कमाल ५ तास, शिक्षण मंत्रालयाची कोचिंग संस्थांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

**नवी दिल्ली–**देशात कोचिंग संस्था आता १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना प्रवेश देऊ शकणार नाहीत. कोचिंगमध्ये माध्यमिक (दहावी) परीक्षेनंतरच नाव नोंदणी होऊ शकेल. यासोबतच कोचिंगमध्ये विद्यार्थी एका दिवसात कमाल पाच तासच शिकतील.विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या, आगीच्या घटना, सुविधांचा अभाव, त्यांच्या शिक्षण पद्धतीबाबत प्राप्त तक्रारीनंतर केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने ही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.मंत्रालय म्हणाले, कोचिंग संस्था पदवीपेक्षा कमी पात्रतेचे शिक्षक ठेवू शकणार नाहीत. ते मुलांच्या नोंदणीसाठी पालकांना दिशाभूल करणारी आश्वासने, रँक किंवा चांगल्या गुणांची हमी देऊ शकणार नाहीत. मंत्रालय म्हणाले, याचा उद्देश कोचिंग संस्थांचे नियमन करण्यासाठी कायदेशीर संरचनेची गरज पूर्ण करणे व त्यांची वाढती संख्या थांबवणे आहे. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कोचिंग संस्थांच्या उपक्रमांच्या देखरेखीची जबाबदारी सर्व राज्य सरकारांची असेल.विद्यार्थी–शिक्षकांना एक दिवस साप्ताहिक सुटी द्यावी लागेल. याच्या पुढच्या दिवशी कोणतीच चाचणी होणार नाही.नोंदणीनंतरच कोचिंग सुरू होऊ शकेल. सध्याच्या कोचिंगना तीन महिन्यांत नोंदणी करावी लागेल. संस्थेच्या शाखा असल्यास सर्व स्वतंत्र यूनिट असतील. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक जागा व संसाधने नसेल तर नोंदणी नाही. प्रति विद्यार्थी किमान १ चौरस मीटर जागा असावी. सर्व नोंदणीकृत विद्यार्थ्यांना नोट्स व पुस्तके अतिरिक्त शुल्काविना द्यावे लागतील. एखाद्या अभ्यासक्रमाचे शुल्क घेतल्यानंतर वाढवता येणार नाही. कोचिंगमध्ये आवश्यक तेथे सीसीटीव्ही कॅमरे लावले जावेत. शाळेच्या वेळेत कोचिंग चालणार नाही. विद्यार्थी व शिक्षकाचे प्रमाण योग्य ठेवावे लागेल. अभियांत्रिकी, वैद्यकीयशिवाय अन्य पर्याय सांगावे लागतील. विद्यार्थ्यांच्या चाचणीचा निकाल सार्वजनिक करू नये. कोचिंग केवळ नोंदणीकृत जागेवरच चालवता येईल.नैतिक गैरवर्तनाच्या गुन्ह्यातील दोषी शिक्षक किंवा व्यक्तीला कोचिंग नियुक्त करू शकणार नाही. आपल्या वेबसाइटवर शिक्षकांची पात्रता, अभ्यासक्रम/ नोट्स, कालावधी, वसतिगृहाची सुविधा व शुल्काचा तपशील असेल. शुल्क पारदर्शक आणि तार्किक असले पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यास शुल्क घेतल्यानंतर पावती दिली जावी. विद्यार्थ्याने मध्येच कोर्स सोडला तर उर्वरित कालावधीचे शुल्क परत करावे.अटींचे उल्लंघन केल्यास पहिल्यांदा २५ हजार रुपये, दुसऱ्यांदा १ लाख दंड लागेल. तिसऱ्यांदा उल्लंघन केल्यास नोंदणी रद्द केली जाईल.



## क्रांतीज्योतीने मानव जातीला स्त्री शक्तीचे सामर्थ्य प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले–प्रा.विजय लोनबले

**मूल । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांनी मानव जातीला स्त्रीशक्तीचे सामर्थ्य प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.प्रतिकूल काळाच्या चौकटीत त्यांनी स्वतःच्या मानसिकतेला जो आकार दिला त्याला जगात तोड नाही. फुले दाम्पत्यांचा आदर्श घेऊन घराघरात स्त्रियांच्याही अस्तित्वाचा विचार स्वतंत्रपणे व्हायला पाहिजे, त्यांनी केलेल्या त्यागामुळे व परिश्रमामुळेच बहुजनांचा उद्धार झाला.समाजातील सुशिक्षित व विचारवंताने पुढे येऊन बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी झटले पाहिजे असे मत पळसगाव खुर्द येथे दिनांक ७ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती सोहळा व प्रबोधन कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा. विजय लोनबले यांनी केले.प्रमुख मार्गदर्शक अँड .प्रशांत सोनुले यांनी सावित्रीमाईनी शेनमारा,दगड धोंडे ,शिव्याशाप खाऊन मुलींसाठी शाळा काढल्या,आज आपल्याला तिच्या त्यागामुळे मान सन्मानाच जगण मिळाल.आज सरकारी शाळा बंद करण्याचा घाट या व्यवस्थेने मांडला आहे गावातील व वस्त्यातील शेतकरी शेतमजूर यांच्या



मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र या व्यवस्थेने निर्माण केलेले आहे तेव्हा आपण सतर्क राहिले पाहिजे असे विचार मांडले प्रा.सुरेश लोनबले यांनी १९ व्या शतकातील स्त्री व आजची स्त्रियांची स्थिती यावर विस्तृत मार्गदर्शन केले.याप्रसंगी प्रा.डॉ. कोकोडे , सीमा लोनबले,प्रा.डॉ.रामटेके, प्रा. झाडे यांनी सावित्रीबाईच्या जीवनावर प्रकाश टाकला,प्रमुख अतिथी म्हणून नरेश शेंडे,निराशा लेनगुरे,होमदेव रंदये , भालचंद्र शेंडे,प्रभाकर ताडाम, प्रवीण रामटेके , रमेश शेंडे,मिलिंद मेश्राम ,चंदा मोहुलें,हिरालाल शेंडे मंचावर उपस्थित होते.दरवर्षी पळसगाव खुर्द येथे ७ जानेवारीला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.सकाळी ग्राम स्वच्छता अभियान राबवून गावातून भव्य मिरवणूक काढली जाते,महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात येतो त्यानंतर सावित्रीबाई फुले यांना अभिवादन सोहळा व प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित केला गेला.या प्रबोधन कार्यक्रमाचे संचालन मुख्य संयोजक संदीप मोहुलें प्रास्ताविक विष्णूजी मोहुलें,आभार मंगेश मोहुलें यांनी मानले.कार्यक्रमाला समाजबांधव,भगिनी,युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकलव्य मॉडल रेसिडेंशियल स्कूल मध्ये प्रवेशासाठी प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षेचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागातंर्गत कार्यान्वित असलेल्या एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमध्ये सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याकरीता प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षा रविवार, दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते २ या कालावधीत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, जांभुळघाट (ता.चिमूर) या ठिकाणी घेण्यात येणार आहे. प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षेचे आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम दि. १० फेब्रुवारी २०२४ आहे.इयत्ता ६ वीच्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व इयत्ता ७ ते ९ वीच्या वर्गातील विद्यार्थी अनुशेष भरून काढण्यासाठी चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता ५वी, ६ वी ते ८ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित/आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.ज्या पालकाचे वार्षिक उत्पन्न ६ लाखापेक्षा कमी आहे, अशा प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांचे पालक,शिक्षक व मुख्याध्यापकांनी सविस्तर माहिती व परीक्षा आवेदन पत्रासाठी नजीकच्या शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा येथील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, चिमूर येथे संपर्क करावा.जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळेमधील अनुसूचित व आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांनी एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमध्ये प्रवेश घ्यावा, असे चिमूर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी एम.व्हि. डुले यांनी कळविले आहे.

## विकास विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

विकास विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय शंकरपुर येथे वार्षिक स्नेहसंमेलन यांचे आयोजन करण्यात आले होते.या वार्षिक स्नेहसंमेलनात मार्गदर्शक म्हणून डॉ .चेतन बेलखोडे यांनी संस्काराची शिदोरी घेऊन आपणास शिक्षण मिळवता येते हे सांगितले तर प्रमुख व्याख्याता म्हणून उद्घाटन प्रसंगी समृद्धी ग्रामरचे लेखक तथा इंग्रजीचे प्रा.डॉ. गणेश धोटे यांनी गुरुने दिलेला यशाचा मंत्र व यश प्राप्तीसाठी आरोग्य , संस्कार, ध्येय निश्चिती सह वेळेची नियोजन करणे गरजेचे आहे यावर आपले मत व्यक्त केले, तर प्रसिद्ध लेखिका चंद्रपूर येथिल आलेल्या गीता देव्हारे यांनी सांस्कृतिक स्नेहसंमेलन मधून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो हे सांगितले तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे




प्राचार्य बंडु चौधरी शाळा हे ज्ञानदानाचे केंद्र आहे तर ज्येष्ठ शिक्षक रामकृष्ण नन्नवरे यांनी शिस्त आजच्या काळाची गरज तर उद्घाटक संजय बावनकर प्रसिद्ध व्यापारी तथा कृषी केंद्र यांनी शिक्षणा मधून व्यापार करुणही आदर्श नागरिक बनता येते असे मार्गदर्शन करताना सांगितले.सोबतच व्यासपिठावर उपस्थित विकास प्राथमिक मुख्याध्यापक सत्यपाल जाधव , माजी प्राचार्य हिरामण बोरकर , बघेल , पांगुळ कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा . मधुकर बोरकर , प्रा . समर्थ , ज्योत्सना सेलोटे , नागदेवते तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कमचारी यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे संचालन मनीष निखाडे तर आभार प्रदर्शन प्रा. एकनाथ खाडे यांनी केले....

## हंसराज अहीर यांना अयोध्या येथील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पुण्यभूमी अयोध्या नगरीत दि. २२ जानेवारी २०२४ रोजी मर्यादापुरुषोत्तम प्रभु श्रीरामजींच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असून या स्वर्णीम, ऐतिहासीक सोहळ्याच्या निमंत्रणाचा मान मिळाल्याने अतिव आनंद झाला, जीवन कृतार्थ झाले.

या भव्यदीव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील तसेच लोकसभा मतदार क्षेत्रातील नागरीकांमध्ये अतिव आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. मला मिळालेल्या निमंत्रणाबद्दल सर्व संबंधित आदरणीयांचा कायम ऋणी राहील. अशा भावना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केल्या. सर्व श्रीराम भक्तांनी २२ तारखेला श्रीराम ज्योती प्रज्वलित करून दिपोत्सव साजरा करावा असे आवाहन सुध्दा त्यांनी केले आहे.



## लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा–निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून २८ एप्रिल २०१५ पासून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना सुलभ व काल मर्यादित ऑनलाइन सेवा उपलब्ध करून द्याव्या, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांनी अपील मॉडेल प्रशिक्षणादरम्यान दिल्या.नियोजन भवन आज (दि.१८) रोजी आयोजित जिल्ह्यातील सर्व विभागातील प्रथम व द्वितीय अपील अधिका–यांना तसेच प्रत्येक विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख, अधिसूचित सेवाचे प्रथम व द्वितीय अपील अधिकारी उपस्थित होते.लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत नागरिकांची कामे जलद गतीने करण्यात यावी. प्रत्येक विभागाने आपल्या कार्यालयात दर्शनी भागात सेवा अधिनियम बाबत तसेच देण्यात येणाऱ्या अधिसूचित सेवाबाबतचा फलक लावावा. शासनाने आपले सरकार पोर्टलवर ३७ विभागांच्या ५११ सेवा अधिसूचित केलेल्या असून त्यांचा नागरिक ऑनलाईन लाभ घेऊ शकतात. अधिसूचित सेवा नागरिकांना वेळेवर दिल्या जात आहेत किंवा नाही यासंदर्भात सुधारणा होण्यासाठी लोकसेवा आयोग गठीत करण्यात आलेला आहे. नागरिकांना विहित काल मर्यादित सेवा न मिळाल्यास, नामंजूर झाल्यास आता ते सेवांकरिता आपले सरकार सेवा केंद्र व आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाइन अपील करू शकतात. ह्या अपिलांवर प्रथम व द्वितीय अपील अधिकारी कार्यवाही करतील व कार्यवाहीत समाधान न झाल्यास अर्जदारास तृतीय व अंतिम अपील राज्यसेवा हक्क आयुक्त, नागपूर विभाग यांच्याकडे करता येईल. तसेच लोकसेवा हक्क अधिनियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी दिली.यावेळी जिल्हा समन्वयक महा आय.टी. चे जिल्हा समन्वयक विकास लालसरे यांनी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांना आपले सरकार अपील मॉड्यूल बीटा वर्जनबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले.



# आठवणीतील विनय

**रस्त्याने चालताना अनेक प्रकारचे लोक भेटत असतात. परंतु हाताच्या बोटांवर मोजण्याइतके नेमके काहीच आपल्या लक्षात राहतात ते त्यांच्यातील वेगळेपणामुळे. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून शैक्षणिक कार्य करीत असताना विद्यार्थी म्हणून अनेकांची ओळख झाली. परंतु त्या ओळखीतून कायमचा ओळखीत राहीलेला विद्यार्थी विनय वासनिक. आज इतक्या वर्षांनंतरही मला तो आठवतो त्याच्यातील विनयशीलतेमुळे, कलात्मक गुणांमुळे.**




आज गडचिरोलीला गोंडवाना विद्यापीठामध्ये एका कामाच्या निमित्ताने जाण्याचा योग आला. तेथील कामकाज आटोपल्यानंतर सुरुवातीला माझे जुने विद्यार्थी मित्र संदेश सोनुले यांच्याशी काही काळ गप्पा मारल्या. त्याला डॉ. प्रकाश आमटे यांच्या लोकबिरादरी प्रकल्पावर आम्ही काढलेली विशेष पुरवणी भेट दिली. त्याला ती फार आवडली. नंतर दुसरे विद्यार्थी मित्र विनय वासनिक यांची आठवण झाली. त्याला भेटायला मी फोन केला. कुठे आहेस? चौकशी केली. त्याने सांगितले मी माझ्या ऑफिसला आहे सर. तो गडचिरोली येथे शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत आहे. त्याने सविस्तर पत्ता समजावून सांगितला. लगेच आम्ही तिकडे गाडी वळविली. आम्ही जाण्यापूर्वीच तो त्याच्या कार्यालयासमोरील प्रवेशद्वारावर स्वागतासाठी उभा होता. भेट झाली. लगेच त्यांनी नाश्ता करण्यासाठी आम्हाला त्याच्या कार्यालयातील कॅन्टींगमध्ये नेले. कॅन्टीन परिसरातील मोकळ्या निळ्या आकाशाखाली रिकाम्या असलेल्या खुर्च्यांवरती जाऊन बसलो. मी ड्रायव्हरला बाजूला जाऊन बसायला सांगितले. आता आम्ही दोघेच उरलो. आमच्या गप्पा सुरू झाल्या. त्या गप्पांमध्ये गतकालीन स्मृतीचा ओलावा होता. अनेक जुन्या आठवणी दोघांनी परस्परात शेअर केल्या. वर्तमानाची चौकशी केली. निरोप घेत मी माझ्या गावाकडला रस्ता पकडला.

दुसऱ्या दिवशी मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन नागपूरला असल्याने मला कुठल्याही परिस्थितीत आज घरी पोहोचणे आवश्यक होते. मी निघालो आणि रस्त्यामध्ये विनयच्या संदर्भामध्ये अनेक आठवणींचे मोहोळ ताजे झाले. विनय हा (मला नेमकं वर्ष आठवत नाही) परंतु १५ ते २० वर्षांपूर्वीचा माझा विद्यार्थी होता. अतिशय लाजराबुजरा, कमी बोलणारा, कमी उंचीचा, नम्र स्वभावाचा धनी असा विनय आज एका शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये चांगल्या पदावर कार्यरत आहे. त्याने आपल्या कर्तुत्वाने त्याची उंची वाढवलेली आहे. आपल्या लाघवी बोलण्याने त्याने अनेक माणसांचा गोतावळा निर्माण केला आहे. सध्या त्याचा मुक्काम गडचिरोली येथे आहे. त्याची अर्धांगिनी पूजा. तिचे माहेर गडचिरोली. साळा परदेशात फ्रान्स येथे असतो. त्यामुळे सासूबाई छायाताई भीमराव सहारे यांना सांभाळण्याची सगळी जबाबदारी अर्थात विनयवर जावई म्हणून आलेली आहे. अतिशय जबाबदारीने तो ती जबाबदारी पार पाडतो आहे हे त्याचे बोलण्यातून मला जाणवले. आज विनयच्या संदर्भामध्ये मला एक गोष्ट आठवली. विद्यार्थीदशेत असताना काही दिवसांदरम्यान तो ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक आहे हे मला कळले. अर्थात सुरुवातीच्या काळात माझा ज्योतिष्यशास्त्रावर फार विश्वास नव्हता. आजही नाही. परंतु विनयने ज्योतिष्यशास्त्राच्या अभ्यासाच्याआधारे माझ्या संदर्भात जी भाकीते वर्तवली होती ती अनेक बाबतीत खरी ठरलेली आहे. ज्योतिष्यशास्त्र आहे की नाही? याविषयी मला आज बोलायचे नाही. परंतु त्याने केलेल्या अभ्यासातून त्याने लावलेले अंदाज किंवा भाकीते खरी ठरत असल्याचा अनेकांना अनुभव आलेला आहे. घरची आर्थिक परिस्थिती अतिशय बेताची असल्याने या ज्योतिष्यशास्त्राच्या अभ्यासाने त्याला काही प्रमाणामध्ये अर्थार्जनाचा मार्ग गवसला होता. त्यात तो सुखी आणि समाधानी होता. आपल्यामुळे कुणाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असेल तर आपण कशाला मागे हटावे. या हेतूने तो ज्योतिष्यावर भाकीते वर्तवित राहिला. अनेकांना सकारात्मक अनुभव येत राहिले. त्यातून त्याच्याकडे लोकांचा ओढा वाढत गेला.



त्यांनी स्वतः कधीही आपले मानधन मागितले नाही. परंतु त्याने वर्तविलेल्या भाकीतांमध्ये एवढी वास्तविकता असायची की लोक त्याला आपोआप अपेक्षेपेक्षा जास्त मोबदला द्यायचे. तो नाही नाही म्हणत असतानाही त्याच्या स्वाधीन करायचे. अशा या विनयने ज्योतिष्यशास्त्राच्या अभ्यासाच्या माध्यमातून अनेक माणसांचा गोतावळा निर्माण केलेला आहे. खरं म्हणजे ज्योतिषशास्त्र म्हटलं की लोकांना बनवाबनवी आणि अनेकदा थोतांडही वाटतं. परंतु विनयच्या अभ्यासात एवढी ताकत होती की, त्याने अनेकांच्या बाबतीमध्ये बसवलेले अंदाज हे तंतोतंत खरे असायचे. त्या अंदाजातून त्याच्या सभोवती माणसांचा गोतावळा वाढत गेला. लोकप्रियता वाढत गेली. माणसे येत गेली. प्रसिद्धी होत गेली आणि ज्योतिष्यकार म्हणून विनयची प्रतिमा स्थापित झाली. शास्त्रीय डान्स, कथ्थक नृत्य यात त्याला अतिशय आवड होती. त्यासाठी त्याने भद्रावती येथे प्रशिक्षण वर्ग चालविले.शहरात भव्य अशा स्टेज शो चे आयोजन केल्याचे आठवते. ज्योतिष्यशास्त्राच्या त्याच्या अभ्यासाला सुरुवातीला घरून फार विरोध असायचा. घरच्यांनी त्याला त्यापासून परावृत्त करण्याचा अनेकदा प्रयत्न केला. परंतु पुढे हळूहळू जेव्हा त्याचं मोठेपण (त्यांच्या घरी येणाऱ्या मोठ्या माणसांची वर्दळ बघून) कदाचित घरच्या आई-वडिलांनाही कळलं असावं. नंतर घरच्यांचा विरोध हळूहळू मावळला. विनय हळूहळू वाढत गेला. विद्यार्थी दशा संपल्यानंतर त्याला बराच संघर्ष करावा लागला.वाईट काळ होता. त्याचा तो संघर्ष मी स्वतः बघितला आहे. अतिशय विपरीत परिस्थिती होती. मानसिक पातळीवर आघात झाले.अतिशय प्रतिकूल वातावरणामध्ये त्याला काही दिवस काढावे लागले. परंतु त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून नित्यनेमाने अभ्यासाकडे लक्ष दिले. अभ्यासात सातत्य ठेवून नियमितपणे नवनवीन स्पर्धा परीक्षांमध्ये बसत गेला. पुढे अशा स्पर्धा परीक्षांमधून तो पास झाला आणि आज आहे नोकरीत तो स्थिरस्थावर झाला. काल इतक्या वर्षांनी तो मला भेटला. परंतु त्याच्या स्वभावात मला फारसे परिवर्तन जाणवले नाही. तो पूर्वी जसा होता तसाच आजही बघायला मिळाला. त्याच्यातील आत्मविश्वास मला आजही जाणवला. निघताना त्याने मला मुक्काम करायचा आग्रह केला. परंतु मुक्काम करणे मला शक्य नव्हते .कारण पुढील चार-पाच दिवस मला माझ्या कर्तव्य रजेवर वेगवेगळ्या ठिकाणी रुजू व्हायचे होते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत गडचिरोली सोडणे आवश्यक होते. त्याची मला घरी न्यायची इच्छा अपूर्ण राहून गेली. वेळ काढून मी गेलोही असतो तरी त्याचा परिवार मला भेटणे नव्हताच .कारण त्याची अर्धांगिनी पूजा ही बाहेरगावी ब्रम्हपुरी येथे नोकरी करते आणि मुलगी चेरीशा स्थानिक कॉन्व्हेंटमध्ये. शिकते. त्यामुळे परिवाराला भेट न भेटताच मला गडचिरोली सोडावी लागली. प्राध्यापकी पेशामध्ये अनेक विद्यार्थी येतात अन जातात. परंतु लक्षात फार मोजके विद्यार्थी राहतात. किंवा दुसऱ्या भाषेत असं म्हणून की केवळ मोजकेच विद्यार्थी प्राध्यापकांशी असलेले संबंध पुढे चालवितात. अनेक विद्यार्थी प्राध्यापकांना विसरूनही जातात आणि प्राध्यापकही अनेक विद्यार्थ्यांना विसरून जातात. या विसरण्याच्या स्पर्धेमध्ये जी मोजकी विद्यार्थी मंडळी माझ्या आजही स्मरणामध्ये आहे त्यात विनयचा सर्वोच्च असा क्रमांक लागतो. विनय माझ्या लक्षात राहिला तो केवळ त्याच्या ज्योतिष्यशास्त्रावरील अभ्यासामुळेच. कदाचित पुढेही राहील हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणायचे की, माणसाच्या अंगी कुठलीतरी एक कला असायला पाहिजे. विनयच्या अंगी अनेक कला आहे. तो अतिशय चांगला शास्त्रीय नृत्य शिक्षक आहे. परंतु त्याहीपेक्षा तो माणूस म्हणून खूप चांगला आहे. माणसांना जोडण्याचं कौशल्य त्याने खूप सुरुवातीपासून आत्मसात केले आहे. अतिशय हळू आवाजात बोलणारा मितभाषी विनय समोरच्याच्या हृदयात केव्हा जाऊन बसतो हे कळतही नाही. एकदा माणूस जोडला की त्यांच्याशी शेवटपर्यंत संबंध टिकवून ठेवण्याची कला विनयने आत्मसात केली आहे. स्वभावामध्ये मानवतावादी विचार आहे. आज तो इतक्या वर्षांनी भेटला आणि भेटून जुन्या आठवणी ताज्या झाल्या. खर म्हणजे एखाद्या विद्यार्थ्याच्या स्वभावाबद्दल एवढे विश्लेषण करण्याची पाळी माझ्यावर आजपर्यंत कधी आलीच नाही. आज विनयच्या भेटण्याने ते प्रकट करण्याची संधी मला निर्माण झाली. जरी गुरु शिष्य म्हणून आमच्या नात्याची सुरुवात झाली असेल तरी वर्तमानात आम्ही परस्परांना मित्र म्हणून जास्त प्रमाणामध्ये स्वीकारलेल आहे. असा हा आठवणीतील विनय आज प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत स्वावलंबी झाला आणि आठवणीतील शृखलेत जाऊन बसला.

# बावीस वर्षांपूर्वीचे प्रा.नाईकवाडे सर

**सी पी अँड बेरार महाविद्यालय तुळशीबाग ,नागपूर. विद्यार्थ्यांनी गजबजलेलं महाविद्यालय. सकाळी ७.४५ पासून महाविद्यालय गजबजलेलं असायचं. नागपुरातील तसेच आजुबाजुच्या गावातील तसेच सावनेर, कळमेश्वर, उमरेड, रामटेक कामठी तालुक्यातील मुलंमुली अपडाऊन करायची! तर इतर ठिकाणची मुलंमुली रूम, होस्टेलवरून बरोबर आठ-सव्वाआठ पर्यंत महाविद्यालयात पोचायची. प्राचार्य सुधीर बोधनकर, प्रा.सोवनी, प्रा पाटील, आमच्या मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. वि. स. जोग अगदी वेळेवर येऊन आपल्या कामाला लागत. सकाळी आठलाच वर्गावर प्राध्यापक मंडळी तासिकेवर हजर राहून अध्यापनाचे कार्य सुरू करत. आणि काही प्राध्यापक मंडळी स्टाफरूममध्ये आपल्या अभ्यासात मग्न असतं. सायकल आणि दुचाकींनी महाविद्यालयाचं प्रांगण भरलेलं असायचं. गच्च भरलेल्या वर्गात निरव शांततेत ज्ञानदान सुरू असायचं. क्वचित मुलंमुली बाहेर दिसायची आणि ती वर्गात जावी यासाठी प्राचार्य बोधनकर आणि त्यांचे सहकारी प्राध्यापक प्रयत्नशील असायचे. सुटीच्या वेळेस तर व्हरांडे मुलामुलींनी फुलून निघायचे.**



१९९९-२००० सालची गोष्ट असावी. जवळपास दीडएक महिना उशिराने आमचे गुरुवर्य प्रा. कृष्णा चौधरी यांनी डॉ. वि.स. जोग यांचेशी संपर्क साधून माझा एम. ए. मराठीला प्रवेश करून दिला आणि रोज रामटेकवरून नागपूरला महाविद्यालयात जाणं सुरू झालं. डॉ. वि.स.जोग, डॉ. रेखा वडीखाये, डॉ. अलका इंदापवार, प्रा. सत्यवान मेश्राम, प्रा. अजय कुळकर्णी हे सर आम्हाला विविध विषय शिकवायचे. आम्हाला नाटक भाग्यश्री झाडगावकर शिकवायच्या. मी गेलो त्यावेळी 'एकच प्याला' हे नाटक शिकवण सुरू होतं. पाऊन तास मॅडम एकटक बोलत रहायच्या आणि त्यांनी शिकविलेली एकच प्याला, किरवन्त ही नाटकं आजही जशीच्या तशी आठवतात. मॅडमचा एकेक शब्द काळजाला स्पर्श करून जायचा. डॉ. वि. स. जोग यांचे अर्वाचीन मराठी कविता, डॉ. इंदापवार मॅडम व प्रा. सत्यवान मेश्राम यांच्या साहित्यशास्त्र, तसेच प्रा. रेखा वडीखाये यांच्या तासिकाही जबरदस्त व्हायच्या. एकेक मुद्दा सहज सोपा करून सांगायचे. विपुल संदर्भ तासिकेत द्यायचे. विद्यार्थ्यांवर खूप माया लावायचे. त्यांच्या अडीअडचणी समजून घ्यायचे. महाविद्यालयाचा मराठी विभाग फार फार गर्भश्रीमंत होता. पण किरवंत नाटक शिकवून संपल्यावर 'नटसम्राट' नाटकाच्या काही तासिका झाल्या. नाटक खुलायला लागलं होतं आणि त्यातच झाडगावकर मॅडमच येणं बंद झालं. काही दिवसांनी एक रूबाबदार आणि आत्मविश्वासाने काठोकाठ भरलेल्या चेहऱ्याचे सर वर्गावर आले आणि त्यांचं शिकवण पाहून मनात कुठेतरी खूप गंभीर भाव निर्माण व्हायला लागले! त्यांचं नाव प्रा.राजेंद्र नाईकवाडे. तरुण, तडफदार, अभ्यासू ! अध्ययन आणि अध्यापनावर मनापासून जीव लावणारा, प्रेम करणारा माणूस! तासिकेच्या सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत विलक्षण ताकतीने बोलायचे. बरेच दिवस मला त्यांच्या शिकवण्यातल्या काही गोष्टी कळायच्या नाहीत. कारण आकलनाचा आवाका कमी. पण महेश एलकुंचवार यांचे 'आत्मकथा' नावाचे नाटक शिकवायला सरांनी सुरुवात केली आणि माझा त्यांच्या तासिकेवर जीव जडला. त्यांचा प्रत्येक शब्द कानामनाला तृप्त करून जायचा. त्यातील मुख्य पात्र (मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष) कायम स्मरणात राहीलं! इतकं प्रभावी आणि धारदारपणे त्यांनी शिकविलं. सर्वप्रथम त्यांनी महेश एलकुंचवार यांचा आणि त्यांच्या लेखनप्रवासाचा असा काही परिचय करून दिला की घडोघडी एलकुंचवार यांचे साहित्य वाचल्याशिवाय राहवत नाही. सर शिकवताना अतिशय शिस्तबद्ध असायचे. जणू तो त्यांच्या आयुष्याचाच भाग आहे. ते वर्गात येतांना हातात हजेरी, नाटकाचे पुस्तक, सोबतीला काही झेरॉक्स आणि स्वतःच्या नोट्स घेऊन येत. जो विषय शिकवायचा आहे त्याला मुळापासून हात घालत. त्यांचा आवाज पूर्ण वर्गभर एकसारखा फिरायचा. 'एक शून्य बाजीराव' हे चि.त्र्यं.खानोलकर यांचे नाटक शिकविताना अस्तित्ववाद आणि जागतिक स्तरावरील साहित्यातील वाद आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या साहित्यकृतींचे संदर्भ देत शिकवायचे. अल्बेर कामू,सार्त्र, इब्सेन याविषयी माहिती देतांना ती सविस्तरपणे द्यायचे. पु.ल.देशपांडे यांचे 'तुझे आहे तुजपाशी' शिकविताना सुखात्मिका आणि शोकांतिका/शोकात्मिका हा विषयही खोलात जाऊन शिकविला होता. भारतातील विचारधारांचा परिचय या निमित्ताने घडवून आणला होता. आचार्य आणि काकाजी यांच्या जीवनातील द्वंद्व कसदारपणे शिकवलं होतं. आचार्य, काकाजी, श्याम, गीता, वासुअण्णा, देवासचा वाडा आजही तितकाच लक्षात राहतो. वि.वा.शिरवाडकर यांचे नटसम्राट नाटक शिकविताना सर वेगवेगळ्या भूमिकेतून नाटकावर भाष्य करीत होते. नट असलेला वयोवृद्ध म्हातारा आणि त्याची होत जाणारी परवड ज्या तन्मयतेने उलगडत जायचे तितका नाटकातला संवाद काळजात घर करत जायचा.

दुस-या वर्षाला प्राचीन व मध्ययुगीन कविता शिकवायला प्रा. अजय कुळकर्णी , प्रा. रेखा वडीखाये , डॉ. अलका इंदापवार , अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास शिकवायला प्रा. दाते , भाषाविज्ञान शिकवायला प्रा. सत्यवान मेश्राम आणि विशेष ग्रंथकार: पु.ल.देशपांडे शिकवायला डॉ. वि.स. जोग आणि प्रा. नाईकवाडे होते. सर्वच तासिका एकदम छान व्हायच्या. सरांनी त्यावर्षी पु.ल. चे गुण गाईन आवडी, गणगोत हे व्यक्तिचित्र संग्रह 'एका कोळीयाने' ही कादंबरी, तुझे आहे तुजपाशी हे नाटक, नाही आसू नाही माया, विठ्ठल तो आला आला आणि सांत्वन या एकांकिका शिकविल्या. त्याही खूप समरसून! भरपुर नोट्स देऊन. सरांनी त्या वर्षी पुल इतके रंगवून सांगितले की आजही पुल तितकेच आवडतात. साहित्यिक कलाकृती ते तासिकेत जशीच्या तशी उभी करायचे. 'एका कोळीयाने' ही कादंबरी शिकविताना त्यांनी अर्नेस्ट मिलर हेमिंग्वे यांचा दीर्घ परिचय करून देऊन 'द ओल्ड मॅन अँड द सी' या कादंबरी निर्मितीमागच्या प्रेरणांचा सखोल आढावा घेतला होता. अनुवाद करतांना पुलंची भूमिका कोणती होती यावरही त्यांनी विविध भूमिकेतून प्रकाश टाकला होता. माणसाला ठार करता येईल. माणसाची हार नाही करता येणार., मी जगावेगळा म्हातारा आहे. माणसाला हार खाण्यासाठी जन्माला घातलेलं नाही ही कादंबरीतली सरांच्या आवाजातील वाक्ये आजही आठवतात! सांतीयागो सरांनी जसाच्या तसा उभा केला होता. त्या वर्षी दीर्घकाळ चालल्या त्या तासिका म्हणजे गणगोतआणि गुण गाईन आवडी या पुस्तकांच्या! प्रत्येक व्यक्तिचित्राचा चौफेर परिचय सरांनी करून दिला. सांत्वन, नाही आसू नाही माया, विठ्ठल तो आला आला ह्या एकांकिका सरांनी रसाळ गमतीदार पद्धतीने शिकविल्या. अगदी गंभीरपणे शिकविणारे सर 'विठ्ठल तो आला आला' शिकविताना कधी मंद तर कधी मनसोक्त हसताना दिसायचे. मात्र 'सांत्वन', 'नाही आसू नाही माया'त तर त्यांच्यातला विचारी पुरुष धीरगंभीर होऊन जायचा. पण त्या वयात यातल्या काही बाबी समजायच्या, तर काही डोक्यावरून जायच्या! कधी कधी तर त्या उशिरा समजायच्या. पण सरांचं शिकवण खूप खूप आवडायचं.

सर शिकवतांना त्यावेळी मला असं वाटायचं की ते काही वेगळं सांगत आहेत. त्यांच्यात विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याची तळमळ आहे. शिकविण्यातून विद्यार्थी साहित्याचा जाणकार असलेला सुजाण नागरिक घडवावा अस त्यांना वाटत असावं. वर्गात शिकवतांना कमालीचे शिस्तबद्ध असायचे. कुठेही फापटपसारा न करता मुद्देसूद बोलायचे. अनेक संदर्भ देऊन विषय खुलवून सांगायचे. सोबतीला ताज्यातवाण्या काढलेल्या मुद्देसूद नोट्स. अगदी अनुकुचीदार पेनाने लिहिलेली मोत्यासारखी अक्षरे. स्वच्छ, स्पष्ट, सुंदर मनाला भावणारी आणि पटापट वाचता येणारी! वर्गात दिलखुलास बोलायचे. हातचं काहीच राखायचे नाही. सार काही देऊन टाकायचे. माझ्या मनात त्यांच्या तासिका हलत डुलत राहतात. सर प्रचंड उर्जावान आणि आत्मविश्वासाने भरलेलं व्यक्तिमत्त्व आहे, असं सतत वाटायचं. त्यांच्याजवळ माणसं आणि साहित्य समजून घेण्याची उपजत क्षमता असून संशोधन समीक्षेत त्यांना मुळापासून रस आहे असं वर्गातल्या शिकवण्यावरून वाटायचं. सर शिकवतांना मला संत तुकाराम महाराजांची तुका म्हणे झरा। आहे मुळीचाच खरा ही ओळ आठवत राहायची. त्यांच्यापासून बरच शिकायचं राहून गेलं. पण त्यांनी लिहिलेले समीक्षा ग्रंथ, संपादित ग्रंथ वाचले की आताही सर शिकवत आहेत असं वाटतं! विविध ग्रंथांवरील त्यांची मासिकातील परीक्षणे, वर्तमानपत्राच्या पुरवण्यांतील लेख, परीक्षणे सतत शिकवितात आणि मनात सी. पी. अँड बेरार मधील दिवस आठवायला लागतात. सरांच्या अभ्यासाने, त्यांच्या कर्मप्रवृत्त आचरणाने साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात त्यांना मानाचं स्थान प्राप्त झालेलं आहे. जीवन सुंदर करण्याचं स्वप्न पाहणारा दिर्घोद्योगी माणूस स्वसहित समूहालाही माणुसकीचे मंगलगीत स्वरात गायला लावतो. ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते ते ज्ञानाचे मंदिर हे सत्य शिवाहून सुंदर हे ह्या ओळी मनात येतात आणि सरांची आठवण येऊन बावीस वर्षांपूर्वीचे आमचे नाईकवाडे सर आठवायला लागतात. मनसोक्त शिकविणारे. अस वाटत सर गुणगुणत असतील,अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन आशा किनारा तुला पामराला!

**जगदीश गुजरकर**
**रामटेक**
**९९७५०२६१४१**

# अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे आवाहन

**चंद्रपूर**-चांदाफोर्ट, रेल्वे स्टेशन येथे एक अनोळखी पुरुष मृतावस्थेत पडून असल्याची माहिती रेल्वे पोलीसांना मिळाली. अनोळखी मृत पुरुषाच्या नातेवाईकाचा शोध घेतला असता उपयुक्त माहिती मिळून आली नाही. सदर मृत इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन रेल्वे पोलीस चौकी, नागभीडमार्फत करण्यात येत आहे.

अनोळखी मृत व्यक्तीचे वर्णन पुढीलप्रमाणे :वय अंदाजे ५५ वर्ष, उंची ५ फुट ४ इंच, रंग निमगोरा, सडपातळ बांधा, केस काळे-पांढरे लांब, दाढी मिशी पांढरी वाढलेली, चेहरा लांबट, नाक सरळ, डावा डोळा बंद व उजवा डोळा उघडा, दात लालसर, अंगात पिवळया रंगाचा मळलेला हाफ शर्ट, काळया-निळया रंगाचा जर्कींग, पांढऱ्या रंगाचा गमछा या वर्णनावरून सदर मृतक अनोळखी व्यक्तीला कोणी ओळखत असल्यास तपासी अमंलदार ७०६६२२३५२० या भ्रमणध्वनी क्रमांकावर तसेच रेल्वे पोलीस चौकी, नागभीड येथे संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# नार्वेकरांनी घेतलेला निर्णय अभ्यासपूर्ण दादा भुसे

**मुंबई**-विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी दिलेल्या शिवसेनेच्या १६ आमदारांना अपात्रेसंदर्भातील निकालावर अनेक बाजूने टीका होत आहे. यावर शिंदे गटाचे मंत्री दादा भुसे म्हणाले- नार्वेकरांनी आमदार अपात्रतेचा निर्णय अतिशय अभ्यासपूर्ण आणि विचारपूर्वक दिलेला आहे. मात्र, तरीदेखील उद्धव ठाकरे आणि त्यांच्या गटाकडून त्यावर प्रश्न उपस्थित केला जात आहे. असे प्रश्न उपस्थित करणे म्हणजे न्यायालया थेट आव्हान दिल्यासारखेच आहे.ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल कायदेतज्ञांसह महापत्रकार परिषद घेऊन नार्वेकर यांच्या निकालाची चिरफाड केली होती. त्याला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला होता. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे गटाकडून देखील ठाकरे यांच्यावर पलटवार होऊ लागला आहे.यासंदर्भात दादा भुसे म्हणाले- उद्धव ठाकरे नार्वेकर यांच्या निकाल देण्याआधी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते. आपल्या बाजूने निकाल लागला तर चांगले विरोधात गेला तर वाईट, अशी त्यांची भूमिका सुरुवातीपासून दिसत होती. त्याचा अनुभव आता संपूर्ण राज्याला येऊ लागला आहे. सभापती राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालावर टीका करून ठाकरे एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयावरच शंका उपस्थित करत आहे आणि हे योग्य नाही.प्रत्येक न्यायाला दोन बाजू असतात. ज्याला तो न्याय मान्य नाही, त्याला दाद मागण्याची तरतूद आणि अधिकारदेखील आहेत. मात्र न्यायावरच प्रश्नचिन्ह निर्माण करून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न शिवसेना उद्धव ठाकरे गट जाणीवपूर्वक करत आहे. लोकशाहीमध्ये हे अभिप्रेत नाही, असे भुसे म्हणाले. एकत्रितपणे ठाकरे गटाने महापत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री शिंदे गट आणि भारतीय जनता पक्षाला जनतेमध्येच आव्हान देण्याचा प्रयत्न केला.मुख्यमंत्री शिंदे आणि विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांच्या कामकाजावर गंभीर प्रश्न निर्माण केले. त्यामुळे शिंदे गट आणि नार्वेकर दोघेही अस्वस्थ आहेत. नार्वेकर यांनी लगोलग पत्रकार परिषद घेऊन उत्तर दिल्याने त्याला दुजोरा देखील मिळाला आहे. मात्र यातून आगामी काही काळ शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न चर्चेत राहणार, हे स्पष्ट आहे.

# मला गोळ्या घातल्या तरी बाजूला सरकणार नाही : माझ्या विरोधात सरकारकडून ट्रॅप लावला जातोय - मनोज जरांगे

**जालना–**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कालच बोलणे झाले आहे. किती जणांना प्रमाणपत्र दिले आणि त्यांच्या परिवारातील किती लोकांना आपण प्रमाणपत्र दिले याबद्दल माहिती देण्यात यावी अशी मागणी मनोज जरांगे यांनी प्रशासनाकडे केली आहे.मनोज जरांगे पुढे बोलताना म्हणाले की, ५४ लाख मराठ्यांच्या नोंदी सापडल्या आहेत पण प्रशासनाने किती जणांना कुणबी दाखला दिला. त्यांच्या सोयऱ्यांना दाखला दिला?, असा सवाल करतानाच शासकीय अधिकाऱ्यांनी किती अडवणूक केली म्हणत त्यांनी हल्लाबोल केला आहे. तर आधीच हे सर्व दाखले दिले असते तर मराठा समाजावर मुंबईला जाण्याची वेळ आलीच नसती, आता आम्ही मुंबईला जाण्याची तयारी केली आहे, असा इशारा त्यांनी दिला आहे.मनोज जरांगे म्हणाले की, महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना आरक्षण देण्याची आमची मागणी आहे. आम्हाला माहिती आहे की, सरकार आमच्यावर डाव टाकण्याचा प्रयत्न करत आहे. मला खात्रीलायक माहिती मिळाली आहे. माझ्यावर ट्रॅप लावण्याचा प्रयत्न करत आहे. आमच्या रॅलीत कुठेतरी त्यांचे लोकं घुसविण्याचा प्रयत्न सुरू आहे हे आम्हाला त्यांचेच लोकं सांगत असल्याचा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. त्यांचेच अधिकारी मला सांगत आहे.मनोज जरांगे म्हणाले की, छगन भुजबळ म्हणाले की २०० बंदूक विकत घेतल्या आहेत. आमच्या मनगट चांगले आहे. हिंसाचार करण्याचा प्रयत्न करतील त्यांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन करायचे, असे आवाहत मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. तर मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काही मंत्र्यांचा विरोध आहे, त्यांना आम्हाला मुंबईत येऊ द्यायचे नाही आणि आलो तरी आमच्याकडे दुर्लक्ष करत आमचा अपमान करायचा असा काही मंत्र्यांचा प्लॅन आहे, त्यांची नावे उद्या संध्याकाळपर्यंत मी नक्की करेल असे त्यांनी म्हटले आहे.मनोज जरांगे म्हणाले की, कुणीही येऊ द्या मी त्यांना खेटायला तयार आहे. सरकार असो की विरोधी पक्ष असो कुणी मला खेटायला येत असेल तर मी खेटायला तयार आहे असे म्हणत मनोज जरांगे यांनी इशारा दिला आहे. सरकार गाव आणि तालुका लेव्हलवर चौकश्या करत आहेत. कोण आमच्या बाजूने आहे हे आम्हाला समजत आहे. विरोध करणाऱ्यांना आम्ही मोजत नाही, आपल्या लोकांनी विश्वास घात करू नये.



# अपघात उपचारासंबंधी चर्चासत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद



**परभणी । प्रतिनिधी**

मराठवाडा विभागस्तरीय वरिष्ठ डॉक्टरांचे अपघात उपचारासंबंधी रविवारी ता. १४ जानेवारी रोजी परभणीत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते,.अपघात उपचारासंबंधीच्या या चर्चासत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान, चर्चासत्रात जवळपास एक हजार डॉक्टर मंडळींनी सहभाग नोंदवला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खच- अध्यक्ष डॉ.रवींद्र कुट्टे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करताना राज्यस्तरीय चर्चासत्र परभणीत आयोजित करावे अशी सूचना केली. कार्यक्रमांमध्ये मराठवाड्यातील ख्यातनाम न्युरोसर्जन डॉ. ऋतुराज जाधव, यशोसाई हॉस्पिटल नांदेड यांना मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, त्यांनी बोलताना या भागांमध्ये मागील २५ वर्ष सेवा देताना येणाऱ्या विविध रुग्णांविषयीच्या अनुभवाचे कथन केले तसेच रुग्णांचे नातेवाईकांनी केलेल्या सहकार्य व विश्वासाबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमांमध्ये डॉ. रमाकांत बेंबडे ख्खातनाम प्लास्टिक सर्जन छत्रपती संभाजी नगर यांनी मागील २५ वर्षांमध्ये मराठवाड्यातील हजारो रुग्णांना विशेषतः जळीत रुग्णांना जीवनदान दिले व त्यांचे पुढील आयुष्य सुखकर केले त्यांनी सुद्धा मराठवाड्यातील रुग्ण व इतर डॉक्टरांचे आजपर्यंत केलेला सहकार्याबद्दल ऋण व्यक्त केले व येथून पुढील काळात सुद्धा तत्पर प्रतीची रुग्णसेवा देण्याचे कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजगोपाल कालानी अध्यक्ष इंडियन मेडिकल असोसिएशन परभणी यांनी अपघाता विषयी जागरूकता व वेळेस उपचाराकरिता आवश्यक असे मार्गदर्शन करताना या चर्चासत्राला शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन डॉं. कल्याण कदम निवासी वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय यांनी उपस्थिती डॉक्टरांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शकुंतला रामराव गबाळे सोशल फाउंडेशन परभणी, इंडियन मेडिकल असोसिएशन परभणी व देवगिरी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल टीम तसेच डॉक्टर श्रीकृष्ण कातनेश्वरकर, डॉक्टर मगर , डॉक्टर श्रीराम मसलेकर, डॉक्टर विवेक नावंदर, डॉक्टर परमेश्वर साळवे डॉक्टर अशोक बन, डॉक्टर अमोल भालेराव, यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सचिव डॉ. एकनाथ गबाळे डॉक्टर निनाद सूर्यतळे, डॉक्टर निहार चांडक, डॉक्टर सागर मोरे व डॉक्टर विजय बोंडे यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या करण्यासाठी खूप परिश्रम घेतले.

# ठाकरेंच्या महापत्रकार परिषदेचा टिझर रिलीज:पत्रकार परिषदा घेऊन वस्तुस्थिती बदलता येणार नाही-अध्यक्ष राहुल नार्वेकर

**मुंबई–**शिवसेना आमदार आपात्रता प्रकारणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची महापत्रकार परिषद आज होणार आहे. या पत्रकार परिषदेचा टिझर रिलीज करण्यात आला आहे. दरम्यान, या पत्रकार परिषदेवरून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी टोला लगावला आहे. पत्रकार परिषदा घेऊन वस्तुस्थिती बदलता येणार नाही असे त्यांनी म्हंटले आहे.ठाकरे गटाकडून आज या महा पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आज दुपारी ४ वाजता वरळी डोम याठिकाणी एका मोठ्या सभागृहात ही पत्रकार परिषद पार पडेल. या पत्रकार परिषदेत नेमकं कोणते मुद्दे उपस्थित केले जाणार याकडे सर्वांचे आहे. एकीकडे विधानसभा अध्यक्षांच्या या प्रकरणातील निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाने याचिका दाखल केली असून लढण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे या पत्रकार परिषदेमध्ये नेमके कोणते गौप्यस्फोट केले जाणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.यामध्ये निकालाशी संबंधित



चिरफाड करणार असल्याचे विधान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले होते. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी खरी शिवसेना शिंदेंचीच असल्याचा निकाल दिला होता. यानंतर ठाकरे गटात संतापाची लाट उसळली. १६ जानेवारी रोजी पत्रकार परिषद घेऊन निकालाबाबत भाष्य करणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले होते. पत्रकार परिषद म्हणजे एक प्रकारे 'जनता न्यायालय' असेल. 'सत्य ऐकून विचार करा!' असं ठाकरे गटाकडून या पत्रकार परिषदेबद्दल सांगण्यात येतं आहे.याबाबत बोलतांना नार्वेकर म्हणाले, '' मी कुणाला संतुष्ट करण्यासाठी निकाल दिला नाही. मी कायद्याला धरून निकाल दिला आहे. कायद्याच्या अनुषंगाने, राज्यघटनेत ज्या तरतुदी आहेत सोबतच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार हा निकाल दिला आहे. आपल्या देशात कोणताही नागरिक, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात दाद मागू शकतो. याचिका दाखल केली म्हणजे मी दिलेला निकाल चुकीचा दिला असे होत नाही. माझा निकाल चुकीचा ठरविण्यासाठी काय नियमबाह्य झाले ते सिद्ध करावे लागणार आहे. तरच तो निकाल मागे घेतल्या जाऊ शकतो'', असे थेट आव्हानच अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ठाकरेंना दिले आहे.तसेच दिलेल्या निकालाविरोधात घेतल्या जाणाऱ्या पत्रकार परिषदवर बोलताना नार्वेकर म्हणाले की, ''तो त्यांचा अधिकार आहे. पत्रकार परिषदा घेऊन वस्तुस्थिती बदलता येणार नाही. वस्तुस्थिती तीच आहे जी मी निर्णयात दिली आहे. माझ्या निर्णयात वस्तुस्थिती काय आहे? काय नियमबाह्य आहे? काय बेकायदेशीर आहे? ते दाखवा, त्यानंतर पुढे बोलता येईल, परंतु निर्णयातील कुठचीही बाब चुकीची न म्हणता ते फक्त आरोप करणार असतील तर राज्याची जनता ही सुज्ञ आहे. त्यांना सगळं समजते'', असेही विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यावेळी म्हणाले.

# ऊसतोडणी मजुरांना सुविधा आणि मुकादमांच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार–आ.सुरेश धस

## विविध ऊसतोड संघटनांकडून आ.धस यांचे आभार मानत सत्काराचे आयोजन

**आष्टी–** भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई साहेब मुंडे यांचे नेतृत्वाखाली.. ऊसतोडणी कामगार आणि मुकादम संघटनांना बरोबर घेऊन संघर्ष केल्यामुळे या करारा वेळी ऊसतोडणी कामगार आणि मुकादम यांना ऊस तोडणीचा दर आणि मुकादमांचे कमिशन यामध्ये भरीव वाढ मिळाली असून यापुढे देखील रात्रंदिवस काबाडकष्ट करणारे ऊस तोडणी मजुरांना मूलभूत सुविधां बरोबरच आरोग्य, शिक्षण आणि आणि ऊस तोडणी मुकादम यांच्या हिताचे निर्णय होण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहून शासन दरबारी त्यांच्यासाठी लढत राहू..अशी ग्वाही आ.सुरेश धस यांनी दिली.

आष्टी येथे ऊस तोडणी कामगार आणि मुकादम संघटनांच्या वतीने ऊसतोडणी दर आणि मुकादम यांच्या कमिशनमध्ये चांगली दरवाढ मिळवून दिल्याबद्दल सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लोकनेते स्व.गोपीनाथराजी मुंडे ऊसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप, सचिव सुरेश वनवे, भाऊसाहेब आंधळे, दत्तोबा भांगे, विष्णुपंत जायभाये, संजय तिडके, देविदास तोंडे, चाळीसगावचे विश्वजीत पाटील, मालेगावचे माळी पोलीस हे उपस्थित होते.पुढे बोलताना आ.सुरेश धस म्हणाले की,या दरवाढी बद्दल..आपण राज्यातील सर्व संघटनांचेवतीने एकत्रितपणे पंकजाताईसाहेब मुंडे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करू..शंकरराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना बबनराव ढाकणे यांच्या नेतृत्वाखालील संघटनांनी लढा दिल्यामुळे ऊस तोडणी मजूर आणि मुकादम यांना ६५ टक्के भाव वाढ देण्यात आली त्यानंतर ऊस तोडणी मजूर आणि मुकादमांचे नेतृत्व स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी ऊसतोड मजूर आणि मुकादम यांना ७० टक्के एवढी भाववाढ मिळवून दिली.त्यावेळी मी वेगळ्या राजकीय पक्षात होतो तरीही मी ऊसतोड कामगारांच्या आणि मुकादमांच्या या जिव्हाळ्याच्या असलेल्या प्रश्नावर याबाबत एकत्रित निर्णय घेतले राज्यात ऊस उत्पादन जास्तीचे झाले असता ऊस तोडणी मजूर आणि मुकादम यांच्या प्रश्नांची साखर संघ आणि कारखानदार काळजी करत नसतात परंतु ऊस उत्पादन कमी असताना या दोन्ही घटकांचे महत्त्व वाढत असते साखर संघ आणि साखर कारखानदार यांच्याकडून ऊस तोडणी मजुरांना दरवाढ आणि मुकादमांना कमिशन वाढवून घेणे हे सोपे नसते ऊस तोडणी कामगार आणि मुकादम यांच्या अनेक संघटना आहेत परंतु त्यातल्या काही संघटना या मजूर आणि मुकादमांशी निगडित नाहीत दुर्दैवाची गोष्ट अशी की काही संघटनेच्या अध्यक्षांना सध्याचा ऊसतोडणी दर देखील माहित नसतो परंतु कारखानदारांचे हित जपण्यासाठी संघटनांमध्ये फूट पाडण्याचे काम करत असतात त्यामुळे ऊसतोड कामगारांच्या सर्व संघटनांनी एकत्रितपणे सर्व समन्वय ठेवून एकमेकांशी सुसंवाद ठेवून काम करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे..कारण हा ऊस तोडणी व्यवसाय संकटात आलेला आहे कारण ऊस तोडणी साठी अग्रिम रक्कम वाटप करण्यात आलेल्या मजुरांकडून अनेक मुकादमांची फसवणूक झालेली आहे परंतु यासाठी कडक कायदे नसल्यामुळे मजूरांच्या ऐवजी मुकादमांवर गुन्हे दाखल होतात कारखाना प्रशासन पोलीस प्रशासनाला हाताला धरून मजूरां ऐवजी मुकादमांवर गुन्हे दाखल करत आहेत हे चुकीचे असून यासाठी शासनाने कठोर कायदा करण्याची आवश्यकता असून लवकरच याचा मसुदा तयार होणार आहे असे सांगितले.. ऊस तोडणी मजुरांकडून मुकादमांची फसवणूक टाळावी यासाठी काही उपाय करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून आ.सुरेश धस म्हणाले की प्रत्येक साखर कारखाना प्रशासनाने आपल्या यंत्रणेद्वारे मजुरांची ऑनलाइन नोंदणी करावी आणि त्याची माहिती मुकादमांना द्यावी मुकादमांना देखील स्वतंत्र (लायसेन्स )परवाना देण्यात यावा..मुकादमांनी आपली स्वतंत्र यंत्रणा तयार करून कोणत्या मुकादमाकडे कोणत्या मुजराची उचल



असून एका मजुराने अनेक मुकादमांकडून उचल घेऊ नये यासाठी आपसातील व्यवहाराची माहिती एकमेकांना देऊन माहिती करून घ्यावी जेणेकरून फसवणूक करणारे मजूर माहिती होतील आणि ज्या मजुरांनी यापूर्वी फसवणूक केलेली आहे त्यांची वेगळी स्वतंत्र नोंद घेण्यात यावी कारण तीन मुकादमांची फसवणूक करून चौथ्याकडील उचल घेणे घेणे आणि कामावर न जाता पळून जाणे असे भयंकर प्रकार त्यातून कमी होतील यासाठी भा.द.वि.४२० अशा कलमान्वये अजामीन पात्र स्वरूपाचे गुन्हे दाखल करणे आवश्यक झाले आहे..फसवणूक झाल्यामुळे अनेक मुकदमांनी आत्महत्या केल्या असून अनेक मुकादमांनी १० ते २० लाख रुपयांना फटका बसल्यामुळे व्यवसाय बंद केले आहेत ऊस तोडणी मजुरांची उचल, मुकादमांनी दिलेले पैसे, वाहतूकदार मुकादमांनी दिलेले पैसे..हा सर्व व्यवहार कायद्याच्या कक्षेत बसवण्यासाठी मसुदा तयार करण्याचे काम चालू असून लवकरच..मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आणि लोकनेत्या पंकजाताई साहेब मुंडे यांचे मार्गदर्शनानुसार याबाबत बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगून आ.सुरेश धस पुढे म्हणाले की,या बाबत कायदा तयार करण्यासाठी काही संघटनांना काही सूचना द्यायच्या असतील तर त्यांनी त्या लेखीपत्र देऊन आपले म्हणणे मांडावे म्हणजे हा कायदा अधिक चांगला करण्यास मदत होऊ शकेल असे सांगितले..ऊस तोडणी मजूर आणि मुकादम संघटनांनी एकत्रितपणे संघटितपणे काम करून ज्याप्रमाणे ऊस तोडणी दर आणि कमिशन दरामध्ये वाढ पदरात पाडून घेतली त्याचबरोबर ऊस तोडणी मजूर यांच्या आरोग्यासाठी यांच्या शिक्षणासाठी तसेच स्थलांतरित पाल्यांसाठी सुरक्षेच्या उपाययोजनांची आवश्यकता असून या ऊस तोडणी मजुरांना विमा संरक्षण जखमी झाल्यास ५ लाख रु.आणि मयत झाल्यास कुटुंबीयांना १० लाख रु.यामध्ये लहान मुलांचा देखील समावेश करण्यात यावा.. त्याचबरोबर बैलांचा मृत्यू झाल्यास ७० हजार रु.आणि जखमी झाल्यास ३५ हजार रु.अशा प्रकारचा विमा मंजूर करावा तसेच या ऊस तोडणी मुजरांना रात्रंदिवस ऊस तोडणी करताना सतत शिळेपाके अन्न खावे लागते त्यावर उपाययोजना म्हणून बांधकाम कामगारांना ज्याप्रमाणे मध्यान्ह भोजन योजना लागू आहे त्याच धर्तीवर लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊस तोडणी महामंडळाद्वारे किंवा शासनाद्वारे या ऊस तोडणी मजुरांना पहाटेचे भोजन पहाटे ३ ते ५ त या वेळेमध्ये तयार केलेले ताजे जेवणाची मिळण्यासाठी सोय करण्याची एका ठिकाणी तयार करून ऊस तोडणी सुरू असलेल्या ठिकाणी डबे पोहोचवण्याची सोय करावी.. तसेच महिला कामगारांच्या बाळंतपणासाठी त्यांना २५ हजार रु.अनुदान देण्यात यावे.. तसेच सर्वात महत्त्वाचे असलेले ज्या गावी हार्वेस्टर ने ऊस तोडणी सुरू असेल त्या ठिकाणी मुजरांनी ऊस तोडू नये कारण चांगल्या दर्जाचा ऊस हार्वेस्टरने तोडण्यात येतो आणि उर्वरित ऊस हा मजुरांकडून तोडण्यात येतो त्यामुळे मजुरांचे नुकसान होत असते त्यामुळे मुकादमांनी अशा ठिकाणच्या ऊस तोडीच्या चिठ्ठ्या मजुरांना देऊ नयेत.. मजूरांनी असा निर्धार करावा असे त्यांनी शेवटी सांगितले... यावेळी प्रवीण बांगर,अशोक बडे,तुकाराम महाराज तिडके, तात्यासाहेब घुले,बाळासाहेब जोगदंड,महादेव शेंडगे,महादेव दराडे,चंद्रभान मुंडे,अर्जुन तिडके,पिंटू डोंगरे,पोपट सानप, हनुमंत काळे,महादेव झनझन, विकास सानप,बाबुराव केदार,नारायण बडे,बाजीराव सपकाळ राजाभाऊ विघणे,आश्रू कदम आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनानुसार आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने महाकाली मंदिरात स्वच्छता अभियान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

२२जानेवारीला अयोध्या येथे श्री प्रभु रामाची प्राणप्रतिस्थापना करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. त्यांतर आज चंद्रपूरातील माता महाकाली मंदिर येथे आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त विपिन पालिवाल,महाकाली मंदिराचे विश्वस्त सुनिल महाकाले,माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल,कोषाध्यक्ष पवण सराफ,मिलींद गंपावार,यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे,बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे,आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे,करणसिंग बैस,तापोष डे,दिपक पदमगीरवार,विनोद अंनतवार,हेरमन जोसेफ,प्रकाश पडाल,युवती प्रमुख भाग्यश्री हांडे,अस्मिता डोणारकर,आशा देशमुख,चंदा ईटनकर,वंदना हजारे,अनिता झाडे,शांता धांडे,माधुरी बावणे,सतनाम सिंग मिरधा,शंकर दंतुलवार,ताहिर हुसेन,किशोर बोल्लमवार,नकुल वासमवार,मुकेश गाडगे,ॲड परमहंस यादव, बादल हजारे आदींची उपस्थिती होती. येत्या२२जानेवारीला अयोध्येत



आयोजित रामललाच्या प्राणप्रतिष्ठापनेची तयारी जोरात सुरु आहे. महाराष्ट्रातही२२जानेवारीला राज्यभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान राज्यभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात यावे असे आवाहण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत आमदार किशोर जोरगेवार यांनीही मंदिरामध्ये स्वच्छता मोहिम सुरु केली असुन याची सुरुवात चंद्रपूरची आराध्य दैवत असलेल्या माता महाकालीच्या मंदिरातून करण्यात आली आहे. आज गुरुवारी सकाळी८वाजता आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत महाकाली मंदिर परिसर स्वच्छता मोहिमेला सुरवात करण्यात आली. यात चंद्रपूर महानगरपालिका प्रशासन,श्री महाकाली माता महोत्सव समिती,यंग चांदा ब्रिगेड सामाजिक संघटनेने सहभाग घेतला होता. यावेळी मंदिर परिसर संपूर्ण स्वच्छ करण्यात आला. स्वत: आमदार किशोर जोरगेवार यांनीही या मोहिमेत सहभाग घेत स्वच्छता केली.राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात स्वच्छता मोहिम सुरु केली आहे. मुंबई येथुन या माहिमेला सुरवात झाली.आपण विकासाची कामे करत असतो सोबतच स्वच्छता हा ही महत्वाचा विषय राहिला आहे. त्यामुळे शहर स्वच्छ करण्याच्या दृष्टीकोणातुन आज महाकाली मंदिर येथून या मोहिमेची सुरवात झाली आहे. माता महाकालीचे देवस्थान चंद्रपूकरांसाठी श्रध्दा स्थान आहे. येथे हजारो भाविक दररोज येत असतात. त्यामुळे हा परिसर स्वच्छ आणि सुंदर राहीला पाहिजे. या ठिकाणी आल्यानंतर मानसाला मन शांती मिळत असते. त्यामुळे या ठिकाणाहुन आम्ही या स्वच्छता मोहिमेची सुरवात करत असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले असून नागरिकांनीही या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेत आपले शहर स्वच्छ ठेवावे असे आवाहन यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी नागरिकांना केले आहे. तर उद्या सकाळी आठ वाजता काळाराम मंदिर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# रोटरी क्लबच्या वतीने सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सोनंद येथे रायलाचे आयोजन

**सांगोला । प्रतिनिधी**

रोटरी क्लब सांगोला यांनी रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड या कार्यक्रमांतर्गत सांगोला परिसरातील ग्रामीण भागातील तीन हजार विद्यार्थ्यांचा रायला घेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार प्रत्येक शनिवारी एका शाळेवरती रायला घेण्याचे नियोजन केले आहे.

आज मंगळवार दिनांक १६ जानेवारी २४ रोजी सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सोनंद या ठिकाणी रायला घेण्यात आला.

१.यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांचे कोणते स्वप्न आहे हे विचारले जाते विद्यार्थी अगदी आनंदाने आपले स्वप्न सांगतात व त्या

२.स्वप्नासाठी कोणते प्रयत्न करणे आवश्यक आहे हे समजावून सांगणे ही पुढची पायरी आहे.

३.त्यानंतर मुलांना कोणते गुण आवश्यक



आहेत हे शिकवले जाते. त्यानंतर मुलांना तुमच्या समोरचे आदर्श कोण आहेत ?असे विचारले जाते तेव्हा विद्यार्थी आई-वडील, भाऊ आपले गुरुजन यांची नावे सांगतात. तसेच त्यांच्या परिचयातील यशस्वी माणसांची नावे सांगतात. मग मुलांना त्यांचे चरित्र वाचावे. त्यांनी कसा संघर्ष केला हे अभ्यासावे असे सांगितले जाते.

४. शेवटी एक कृती करवून घेतली जाते त्यामध्ये डोळे बंद करून कागद कापण्यासाठी सांगितला जातो व त्या सूचना विद्यार्थी नीट ऐकत नाहीत.तसेच डोळे बंद असल्यामुळे नीट कृती होत नाही. यातून त्यांना संदेश दिला जातो की,आपल्या ध्येयाप्रती आपण डोळे झाक करून चालणार नाही, तर डोळे व कान उघडून नीट ऐकून आपण ध्येयाप्रत वाटचाल केली पाहिजे.तसेच त्यासाठी आपल्या व्यक्तिमत्त्वात गुणात्मक वाढ करणे आवश्यक आहे हे समजावून सांगितले जाते.अशाप्रकारचा रायला आतापर्यंत अडीच हजार विद्यार्थ्यांवर घेण्यात आलेला आहे. आजचा रायला घेण्यासाठी रो.मधुकर कांबळे रो. संतोष भोसले. रो. दीपक चोथे रो.माणिक भोसले रो.शरणप्पा हळळीसागर रो. श्रीपती आदलिंगे रो.डॉक्टर अनिल कांबळे रो.बशीरभाई तांबोळी रो.डोंबे गुरुजी रो.साजिकराव पाटील हे उपस्थित होते. रायला झाल्यानंतर विद्यार्थी, शिक्षक व संस्थापक व अध्यक्ष डी डी कोळसे पाटील यांनी रोटरी क्लबचे धन्यवाद व्यक्त केले. व रोटरीच्या सभासदांना एक एक कलमी आंब्याचे रोप दिले व रोप लावून त्याचा आंबा खाल्ल्यानंतर फोन करण्याचे आवाहन केले.

# राज्यात थंडीचा कडाका वाढला पुढील ४ दिवस थंडीची लाट राहणार

**पुणे**–राज्यात थंडीचा जोर पुन्हा वाढला आहे. अनेक जिल्ह्यांत तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली घसरला आहे. हॉट सिटी म्हणून ओळख असणारे जळगाव सध्या कोल्ड सिटी झाले आहे. जळगावमध्ये सोमवारी ९.९ अंश तापमानाची नोंद झाली. आता पुढील ३ ते ४ दिवस राज्यात थंडी कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.मकर संक्रांतीच्या दिवसापासून राज्यात गारठा वाढला आहे. पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक शहरांचा पारा उतरला आहे. छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नगर व पुणे शहराचा पाराही १० ते १२ अंशांवर दरम्यान होता. संक्रांतीच्या दिवशी उत्तरायण सुरू होताच तापमानात वाढ होण्याऐवजी सायंकाळनंतर तापमान घसरणे सुरु झाले आहे. त्यामुळे सध्या कमालीची थंडी जाणवत आहे.दरम्यान, दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटकमधील हिवाळी पावसाचा जोर संपला. उत्तर भारताकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे किमान तापमानात ४ ते ५ अंशाने घट झाली. उत्तर भारतात १७ जानेवारीपर्यंत दाट धुके राहणार असून थंडीचा कडाकाही राहणार आहे. तसेच महाराष्ट्रात ठिकठिकाणी धुके राहणार असून मंगळवारपर्यंत कडाक्याची थंडी जाणवणार असल्याचे हवामान



विभागाने सांगितले.दक्षिण भारतातील ढगाळ वातावरण आणि उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात ढगाळ वातावरण तयार होऊन किमान तापमानात वाढ झाली होती. दोन दिवसांपासून दक्षिण भारतातील ढगाळ वातावरण निवळले असून उत्तरेकडूनही थंड वारे वाहत असल्याने थंडी वाढली आहे. त्यामुळे किमान तापमानात घसरण झाली आहे.

### सफाई कामासाठी केवळ सफाईकामगारांची जबाबदारी नाही तर

# आपला स्वच्छ परिसर आपली जबाबदारी ही भूमिका प्रत्येकाने घ्यावी-केंद्रियराज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज बांद्रा पूर्व शास्त्रीनगर येथील कुशीनारा बुद्ध विहार परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. स्वतः हाती झाडू घेऊन ना.रामदास आठवले यांनी कुशीनारा बुद्धविहार परिसर स्वच्छ केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ तीर्थ मोहीम अभियान नुसार ना.रामदास आठवले यांनी राज्यभर स्वच्छ बुद्ध विहार परिसर मोहीम राबविणे सुरू केले आहे. आपल्या परिसरात सफाई कामगार सफाईचे काम करतात.मात्र आपल्या घरा प्रमाणे आपला परिसर ही स्वच्छ ठेवला पाहिजे. केवळ सफाई कामगारांवर सोपवून चालणार नाही. आपण ही आपल्या परिसराच्या




स्वच्छतेसाठी दक्ष राहिले पाहिजे आणि आपणही परिसर स्वच्छतेसाठी सहभाग घेतला पाहिजे असे आवाहन आज ना.रामदास आठवले यांनी केले.यावेळी या स्वच्छता मोहिमे चे संयोजक रिपाइंचे रोजगार आघाडी सरचिटणीस महाराष्ट्र राज्य अमित तांबे आणि रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; जिल्हा अध्यक्ष साधू कटके; सुमित वजाळे; किसन रोकडे; रतन अस्वारे; विदर्भ नेते मोहन भोयर ; हेमंत रणपिसे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# 'जीवन सुंदर आहे' व्याख्यान कार्यक्रमाचे जिंतूर येथे आयोजन

**जिंतूर । प्रतिनिधी**

तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने दर्पण दिनाचे औचित्य साधून जिंतूरकरांसाठी पुणे येथील ख्यातनाम व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांच्या जीवन सुंदर आहे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले आहे.मागील अनेक वर्षापासून जिंतूर तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने जिंतूरकरांसाठी साहित्यिक व सांस्कृतिक मेजवानी आयोजित करण्यात येते.महाराष्ट्रातील ख्यातनाम व्याख्याते प्रा.नामदेवराव जाधव, प्रा अमर हबीब, कवी नारायणपुरी, अरुण पवार, भारुड रत्न स्वर्गीय निरंजन भाकरे, वऱ्हाडकार प्रा अशोक पवार, मुंबई येथील आईकारप्रा. प्रशांत मोरे, जयराम



खेडेकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी या व्याख्यानमालेत हजेरी लावली आहे. यावर्षी महाराष्ट्रात आपल्या वक्तृत्वाने समाजमन जागृत करणारे प्रख्यात व्याख्याते प्रा.गणेश शिंदे यांच्या व्याख्यानेच्या आयोजन रविवार २१ जानेवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता जुनी मुन्सफी, भाजी मंडई जिंतूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात विभागीय पातळीवरील पत्रकारांना पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे शिवाय सहकार भूषण व उद्योग रत्न पुरस्कार ही देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी जिंतूरकरांनी सहकुटुंब उपस्थित रहावे असे आवाहन व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया, प्रेस क्लबचे तालुकाध्यक्ष मंचकराव देशमुख, व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष भागवत चव्हाण यांनी केले आहे.

# स्व.मा.आम.गणपतराव देशमुख(आबासाहेब)यांच्यावरील टीका यापुढे सहन करणार नाही-डॉ.अनिकेत(भैय्या)देशमुख

## पाणी आणल्याचा आव आणून स्वतःचीच पाठ थोपटण्याचा केविलवाणा प्रयत्न ; हा पोरखेळ तालुकावासिय ओळखून – डॉ.अनिकेत देशमुख

**सांगोला । प्रतिनिधी**

तालुक्यात पाणी आणले म्हणून एकीकडे सत्कार घ्यायचे आणि दुसरीकडे मात्र शेतकरी बाधवांना पाण्यापासून वंचित ठेवायचे असा तुमचा सध्या उद्योग सुरु आहे. तालुकावासियांना शास्वत विकासापासून कोसो दूर ठेवले असून सध्या तुमची नुसती बोलबच्चनगिरी सुरु आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री, खासदार, तुम्ही आमदार सर्व सत्तेत असताना सुध्दा तुम्हाला शेतकर्यांना आश्वासनाशिवाय काहीही देता येत नाही. तुमचे गणित जनता चांगले ओळखून आहे. येणार्या विधानसभा निवडणुकीत जनता तुमचा वजाबाकी व भागाकार चांगल्याच प्रकारे करणार आहे. यामुळे तुम्ही आम्हाला गणित शिकविण्याची गरज नाही असे इशारा शेकापचे युवा नेते डॉ.अनिकेत (भैय्या) देशमुख यांनी दिला.जे आजोबाला जुळलं नाही,ते तुम्हाला कुठं जमायचं नादाला लागू नका , अशी टीका आ. शहाजीबापू पाटील यांनी स्व.गणपतराव देशमुख यांच्यासह डॉ.अनिकेत देशमुख व डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्यावर एक कार्यक्रमात नुकतीच टीका केली होती. याचा खरपूस समाचार डॉ .अनिकेत देशमुख यांनी घेतला.डॉ.अनिकेत देशमुख म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून शेतकर्यांना पिकविमे मिळाले नाहीत, नियमित कर्ज भरणार्या शेतकर्यांना ५० हजाराचे प्रोत्साहन पर अनुदान मिळाले नाही यासंदर्भात आपण विधानसभेत आवाज उठविला नाही. एकही शब्द ही बोलत नाही. हा शाश्वत विकास बाजूला ठेवून पाणी आणल्याचा आव आणून स्वतःचीच पाठ थोपटण्याचा केविलवाणा प्रयत्न तुमच्याकडून सुरु आहे.हा सर्व पोरखेळ सांगोला तालुका उघडच्या डोळ्याने पाहत आहे.स्व.आबासाहेबांनी स्वतःच्या घरावर तुळशी पत्र ठेवून सांगोला तालुक्यातील विकास केलेला आहे.आमचे दैवत स्व.आबासाहेब यांच्या टिका करण्याच्या अगोदर स्वतः आत्मपरीक्षण करा. पाणी कोणी आणले हे दस्तुरखुद्द केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्यासह अनेक मंत्र्यांनी अनेक कार्यक्रमात सांगितलले आहे. अर्ज विनंत्या करुन पाणी येत नसते त्यासाठी संघर्ष करावा लागतो हे विद्यमान आमदारांनी विसरु नये. त्यामुळे स्व .आबासाहेब यांच्यावर टीका करणे हे शोभनिय नाही.आबासाहेब यांचे आमच्यावर संस्कार आहेत म्हणून आम्ही आज पर्यंत विरोधकांवर टीका करत नव्हतो. तुम्ही जर आमचे दैवत स्व.आबासाहेब यांच्यावर टीका करणार असाल तर यापुढे आम्ही सहन करणार नसल्याचा इशारा डॉ.अनिकेत(भैय्या ) देशमुख यांनी दिला.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथुन मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .